


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा

Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २७९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२१ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# वांद्र्यात अतिक्रमण तोडक कारवाई दरम्यान राडा!

## स्थानिक आक्रमक झाल्यानंतर पोलिसांकडून लाठीचार्ज





### 'दगडफेक करणाऱ्यांवर गुन्हा दाखल होणार'

मुंबई हायकोर्टाच्या आदेशानुसार मुंबईच्या वांद्रे पूर्व येथील निर्मल नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गरिबनगर परिसरात अतिक्रमण विरोधी मोहीम म्हणजेच अतिक्रमण हटवण्याची कारवाई सुरु आहे. या कारवाई दरम्यान काही समाजकंटकांनी कारवाई करणाऱ्या पथकांवर दगडफेक करत या कारवाईत अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला, असं अभिनव देशमुख यांनी सांगितलं.

यावेळी मुंबई पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी योग्य त्या प्रमाणात पोलीस बळाचा वापर करुन समाजकंटकांना पांगवले. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तोडफोड आणि हिंसाचार करणाऱ्यांविरोधात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती अतिरिक्त पोलीस आयुक्त अभिनव देशमुख यांनी दिली.

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, मुंबई :** वांद्रे येथील अतिक्रमण कारवाई सध्या चर्चेत आली आहे. ही कारवाई एकूण चार दिवस सुरु राहणार आहे. काल पहिला दिवस होता. तर या कारवाईचा आजचा दुसरा दिवस आहे. दरम्यान, आज दुसऱ्या दिवशी या ठिकाणी मोठा गोंधळ झाल्याची स्थिती आहे. वांद्रे रेल्वे परिसरातल्या अतिक्रमण हटाव कारवाईला नागरिकांनी विरोध केला. अतिशय आक्रमक होत त्यांनी पोलिसांना धक्काबुक्कीही केल्याचे दिसून आले आहे, त्यानंतर पोलिसांनी त्यांच्यावर सौम्य स्वरुपाचा लाठीचार्ज केला आहे. सध्याच्या घडीला याठिकाणी प्रचंड तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. वाढती गर्दी पाहता पोलिसांनी आता अधिकची कुमक मागवल्याची माहितीही पुढे येत आहे. मोठ्या फौजफाट्यासह सलग दुसऱ्या दिवशीही तोडक कारवाई सुरु आहे.

**● अतिक्रमण कारवाईला सुरुवात कशी झाली?**

दरम्यान, वांद्रे रेल्वे स्टेशन परिसरातील गरीब नगर आणि हद्दीतील ही आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई सुरु आहे. आरपीएफ आणि जीआरपी यांच्यामार्फत ही संयुक्त कारवाई केली जाते आहे. गेल्या काही दिवसांपूर्वीच एका विदेशी ब्लॉगरने वांद्रे येथील रेल्वेपरिसरातील झोपडपट्टी अतिक्रमणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर टाकला होता त्यानंतर या व्हिडिओवर अनेक प्रतिक्रिया आल्या होत्या. विविध माध्यमांनी या प्रकारावर चर्चा केली होती. दरम्यान, रेल्वेच्या जागेवर सुमारे पाच हजार स्क्वेअर मीटर क्षेत्रावर अतिक्रमण झाल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

**● यापूर्वीही कारवाई**

यापूर्वीही या परिसरात अतिक्रमण हटवण्याची कारवाई करण्यात आली होती. मात्र संबंधित रहिवाशांनी उच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर कारवाईला स्थगिती मिळाली होती. त्यानंतर पुन्हा एकदा रेल्वे प्रशासनाने कारवाईचा निर्णय घेतला असून मोठ्या पोलीस बंदोबस्तात ही मोहीम सुरू करण्यात आली आहे.

**● सौम्य लाठीचार्ज !**

कारवाईदरम्यान परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. स्थानिक नागरिकांनी कारवाईला विरोध करत घोषणाबाजी केली. काही जणांनी पोलिसांच्या दिशेने बाटल्या आणि इतर वस्तू फेकल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांकडून सौम्य लाठीचार्ज करण्यात आला. यामुळे घटनास्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, परिसरातील परिस्थिती लक्षात घेता पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त मागवला आहे. रेल्वे प्रशासन आणि पोलीस यंत्रणा कारवाई सुरू ठेवण्याच्या तयारीत असून चार दिवस ठरवलेली ही कारवाई नागरिकांच्या अडथळ्यामुळे पुढील काही दिवस आणखी चालू शकते अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

# देशात या तारखेला मान्सूनची एंट्री! १० राज्यांना मोठा अलर्ट



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, मुंबई :** हवामान विभागाच्या अंदाजानुसार दक्षिण-पश्चिम मान्सून आता वेगाने पुढे सरकत आहे. मान्सून येत्या २६ मे रोजी केरळमध्ये दाखल होण्याची दाट शक्यता आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार मान्सून देशात सक्रिय होण्यासाठी दोन-तीन दिवस लागू शकतात. तर खचृ ने मंगळवारी देशातील कमीत कमी १० राज्यांमध्ये मुसळधार वारे, सोसाट्याचा वारा आणि धुळीच्या वादळांचा इशारा दिला आहे. वीज पडण्याचा इशारा ही देण्यात आला आहे.

**या राज्यात मान्सूनचा दिलासा**

हवामान खात्यानुसार, १९ ते २२ मे दरम्यान जम्मू आणि काश्मीर, २० ते २२ मे दरम्यान उत्तराखंड या राज्यात हलका आणि मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल. या राज्यात ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहतील. अंदमान व निकोबार बेटांवर १९ ते २४ मे दरम्यान पावसाचा परिणाम दिसून येईल. तर पुढील काही दिवसात महाराष्ट्रासह ओडिसा ते पश्चिम बंगालपर्यंत सर्वदूर पावसाला बहर येणार आहे. मध्य भारतात मान्सून अधिक सक्रिय होणार आहे. या भागातील नागरिकांना उकाड्यापासून मोठा दिलासा मिळणार आहे.

**नैऋत्य मान्सूनची झपाट्याने वाटचाल**

नैऋत्य मान्सून मोठी कूच करत महाराष्ट्रासह पश्चिम भागात चालून येत आहे. सध्या अंदमान आणि निकोबार बेटांना मान्सूनने विळखा घातला आहे. परिणामी कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात पावसाची दाट शक्यता निर्माण झाली आहे. अरब सागराजवळून बंगालच्या उपसागरात मान्सून सक्रिय झाल्याचे चित्र आहे. पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे. महाराष्ट्र, मराठवाडा आणि कर्नाटकासह मध्य भारतात कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. त्यामुळे विदर्भ वगळता राज्यातील काही भागात तुरळक ठिकाणी पावसाची हजेरी दिसून येईल.

सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि घाटमाथ्यावर पावसाचा रेनबो डान्स पाहायला मिळू शकतो. रत्नागिरी, सातारा यासह पश्चिम विदर्भातील यवतमाळ आणि वर्धा जिल्ह्यातही काही ठिकाणी पावसाचा शिडकावा होऊन तापमान कमी होण्यास मदत मिळू शकते. पण यामुळे रात्रीचा उकाडा वाढण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे. तर विदर्भातील अनेक जिल्हे सध्या उष्णतेने पोळून निघाले आहेत. पशू-पक्षी आणि प्राण्यांना तीव्र उष्णतेचा सामना करावा लागला आहे. पण पुढील आठवड्यात अनेक भागात आल्हाददायक वातावरण तयार होण्याची शक्यता आहे.

# मार्चमधील अवकाळीच्या नुकसानीपोटी २५ कोटी २० लाखांची मदत मंजूर

## पारनेर व नगर तालुक्यातील २८ गावांना मदतीचा दिलासा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर जिल्ह्यात मार्च २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या नैसर्गिक संकटात बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत मिळावी यासाठी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी सातत्याने शासन स्तरावर पाठपुरावा करत प्रभावी प्रयत्न केले. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार अहिल्यानगर जिल्ह्यातील ३०० गावांमधील तब्बल २७ हजार ६०२ शेतकरी बाधित झाले असून १४ हजार ३४९.३७ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. या नुकसानीपोटी सुमारे २५ कोटी २० लाख रुपयांच्या जो मदतीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला होता त्यास मंजुरी मिळाली आहे.

पारनेर व अहिल्यानगर तालुक्यातील एकूण २८ गावांतील बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आमदार काशिनाथ दाते यांनी प्रशासन व शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत नुकसानग्रस्तांना तातडीने मदत मिळावी, यासाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी वेळोवेळी चर्चा करून प्रस्ताव गतीने पुढे नेण्यास महत्त्वाची भूमिका बजावली.

संकटकाळात शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणारे नेतृत्व म्हणून आमदार काशिनाथ दाते यांची भूमिका यानिमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

पारनेर तालुक्यात २३ गावांतील ४ हजार ८६९ शेतकरी बाधित झाले असून ३ हजार ३६९.०७ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झालेले होते. त्यासाठी सुमारे ५ कोटी ७८ लाख रुपयांच्या मदतीची मागणी करण्यात आली होती. तसेच अहिल्यानगर तालुक्यातील ५ गावांतील ६४३ शेतकऱ्यांचे ४९८.५८ हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते त्यासाठी ८५ लाख रुपयांहून अधिक मदतीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता दोन्ही प्रस्तावास मंजुरी देण्यात आली असून मतदारसंघातील बाधित शेतकऱ्यांना संबंधित अनुदान लाभ मिळणार आहे.

**– आ. काशिनाथ दाते सर**
**(विधानसभा सदस्य)**

# नवी मुंबई मनपात ५०४ इमारती धोकादायक !

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२०, नवी मुंबई :** महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील धोकादायक इमारतींचे सन २०२६-२०२७ या वर्षासाठी विभागवार सर्वेक्षण करण्यात आले आहे. सर्वेक्षणानंतर महानगरपालिका क्षेत्रात एकूण ५०४ इमारती या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६४ अन्वये धोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत.

यामध्ये, अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे अशा 'सी-१' प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या ५२ इमारती तसेच इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरूस्ती करणे अशा 'सी-२ ए' प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या १०२ इमारती आणि इमारत रिकामी न करता रचनात्मक दुरूस्ती करणे अशा 'सी-२ बी' प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या २९७ इमारती त्याचप्रमाणे इमारतीची किरकोळ दुरूस्ती या 'सी-३' प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या ५३ इमारती, अशाप्रकारे एकूण ५०४ धोकादायक इमारतींची यादी घोषित करण्यात आलेली आहे.

ही यादी नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या वेबसाईटवर 'विभाग' सेक्शनमध्ये 'अतिक्रमण विभाग' माहितीच्या सेक्शनमध्ये 'सामान्य माहिती' या अंतर्गत अवलोकनासाठी सहज उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

या यादीमध्ये अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्कासित करण्याच्या 'सी-१' प्रवर्गामध्ये नमूद ५२ इमारतींची नावे व तपशील नागरिकांना सहज कळावा यादृष्टीने ठळक (BOLD) अक्षरात प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६४ मधील तरतुदीच्या अनुषंगाने नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार घोषित इमारतींमध्ये वास्तव्य करणारे मालक/ भोगवटादार यांना ते राहत असलेली इमारत निवासी/ वाणिज्य वापराकरिता धोकादायक असलेबाबत आणि या इमारतींमधील निवासी/ वाणिज्य वापर तात्काळ थांबविणेबाबत तसेच धोकादायक इमारतींचे बांधकाम विनाविलंब तोडून टाकणेबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील दि. ०५ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार लेखी सूचना / नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

'सी-१' प्रवर्गातील इमारतीची विद्युत व जलजोडणी खंडीत करण्यात येईल असेही यात स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे.

अशा धोकादायक घोषित करण्यात आलेल्या इमारतींचे मालक अथवा भोगवटादार यांनी ते रहात असलेल्या इमारतीचा वापर करणे धोकादायक असल्याने इमारत कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचा संभव लक्षात घेऊन सदर इमारतीचा / बांधकामाचा निवासी / वाणिज्य वापर त्वरित बंद करावा आणि सदरची इमारत/ बांधकाम विनाविलंब तोडून टाकावे असे सूचित करण्यात आलेले आहे. अशा प्रकारची कार्यवाही न केल्यास, सदर इमारत / बांधकाम कोसळल्यास होणाऱ्या नुकसानीस फक्त संबंधित जबाबदार असतील, नवी मुंबई महानगरपालिका यास जबाबदार राहणार नाही असे स्पष्टपणे सूचित करण्यात आलेले आहे.



या नोटिसीमध्ये धोकादायक इमारतींच्या नावासमोर रहिवास वापर सुरु आहे अथवा नाही याचीही नोंद करण्यात आलेली आहे. इमारतीच्या वर्गीकरणानुसार इमारतींचा भोगवटा वापर/ रहिवास करणाऱ्या नागरिकांनी इमारत तात्काळ निष्कासित करावयाची आहे किंवा वर्गीकरणानुसार नमूद केल्याप्रमाणे इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरुस्ती करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या भोगवटाधारकांनी इमारत दुरुस्त करून आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. याबाबत कोणत्याही प्रकारे धोकादायक परिस्थिती उद्भवल्यास त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी असे स्पष्ट करण्यात आले आहे.

तरी पावसाळा कालावधीत धोकादायक झालेल्या इमारतींचा/ घरांचा वापर करणे धोक्याचे आहे. त्यामुळे जिवित व वित्तहानी होऊ शकते. म्हणून नागरिकांकडून धोकादायक इमारतींचा/ घरांचा रहिवास/ वापर तात्काळ थांबविण्यात यावा असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे, अन्यथा दुर्दैवीरित्या अपघात घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधिताची राहील याची नोंद घ्यावयाची आहे.




## पराभवाचे राजकारण

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (ईव्हीएम) आणि निवडणूक आयोग यांच्यावर सातत्याने केले जाणारे हल्ले विरोधकांचेच राजकीय अस्तित्व कमकुवत करत आहेत. सन २०१४ नंतर आणि विशेषतः २०१९ पासून भारतीय राजकारणात ही प्रवृत्ती अधिक स्पष्टपणे दिसू लागली आहे. निवडणुकीतील पराभवाचे कारण संघटनात्मक कमकुवतपणा, नेतृत्वाचे अपयश किंवा जनाधारातील घट यामध्ये शोधण्याऐवजी काही विरोधी पक्षांनी थेट संस्थांनाच लक्ष्य करणे सुरू केले. सुरुवातीला सर्वांत सोपे लक्ष्य ठरले ते ईव्हीएम. मात्र त्याबाबतच्या आरोपांना व्यापक जनसमर्थन मिळाले नाही. न्यायालये, तज्ज्ञ आणि तांत्रिक तपासण्या यांनी वारंवार निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता कायम असल्याचे स्पष्ट केल्याने हळूहळू कथन बदलले.

सन २०२२ नंतर थेट भारतीय निवडणूक आयोगालाच लक्ष्य केले जाऊ लागले. 'निवडणूक आयोग पक्षपाती आहे, तो सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली काम करतो' अशी धारणा निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू झाला. पण या संपूर्ण प्रक्रियेत सर्वांत मोठे नुकसान सत्ताधारी पक्षाचे नव्हे, तर विरोधकांच्या स्वतःच्या कार्यकर्त्यांचे, संघटनांचे आणि राजकीय परिसंस्थेचे होते. राज्यशास्त्र आणि संघटनात्मक मानसशास्त्र या दोन्ही क्षेत्रांत एक गोष्ट स्पष्टपणे मान्य केली जाते – विजयाची शक्यता असल्याचा विश्वास हा कोणत्याही राजकीय चळवळीचा प्राण असतो. निवडणूक मोहिमा ऊर्जा, आत्मविश्वास, मनोबल आणि गतीवर चालतात. कार्यकर्त्यांच्या मनात एकदा, संपूर्ण व्यवस्था आधीच ठरलेली आहे, अशी भावना निर्माण झाली, की संघटनात्मक प्रेरणाच कोसळते. कितीही प्रयत्न केले तरी काही बदलणार नाही, असा संदेश सतत दिल्यास माणूस हळूहळू स्वतःचे सर्वोत्तम देणे थांबवतो. साध्या भाषेत सांगायचे तर विरोधक स्वतःच स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेतात.

या कथनाचा परिणाम मतदारांवरही होतो. विशेषतः संभ्रमित आणि तटस्थ मतदारांवर त्याचा प्रभाव अधिक दिसतो. एखादा पक्ष स्वतःच गोंधळलेला, निराश आणि पराभव निश्चित असल्यासारखा वागत असेल, तर तटस्थ मतदार त्या पक्षात भावनिक गुंतवणूक का करेल? आत्मविश्वासपूर्ण प्रचार मोहिमा स्वयंसेवक, देणगीदार, सामाजिक संस्था, प्रभावशाली व्यक्ती आणि स्थानिक संघटनांना आकर्षित करतात. राजकीय तज्ज्ञ यालाच 'बँडवॅगन इफेक्ट' म्हणतात.

या कथनातील विरोधाभासही स्पष्टपणे दिसतो. विरोधी पक्ष मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, हरियाणा किंवा आसाममध्ये पराभूत झाले की निवडणूक आयोग पक्षपाती असल्याचा आरोप केला जातो. पण कर्नाटक, तेलंगण, केरळ, तमिळनाडू, हिमाचल प्रदेश, झारखंड किंवा जम्मू-काश्मीरमध्ये गैर-भाजप पक्ष सत्तेत आले, तेव्हाही हाच निवडणूक आयोग निवडणुका घेत होता, हे मात्र सोयीस्करपणे विसरले जाते.

जगभरातील लोकशाही व्यवस्थांमध्ये असे वारंवार दिसून आले आहे की, वैचारिक अधोगती किंवा संघटनात्मक स्थिरता आलेले पक्ष पराभवाचे दोष बाहेर शोधू लागतात. माध्यमे, संस्था, मतदान प्रणाली, न्यायव्यवस्था किंवा नोकरशाही ही त्यांची लक्ष्ये ठरतात. भारतही त्याला अपवाद नाही. राजकीय पक्ष कायमस्वरूपी तक्रारींमधून नव्हे, तर कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास पुन्हा निर्माण करून, नेतृत्वात बदल करून, तळागाळात विस्तार करून, वैचारिक स्पष्टता आणून आणि संघटनात्मक शिस्त मजबूत करून पुन्हा उभे राहतात.

खरा प्रश्न केवळ निवडणूक पराभवाचा नाही; प्रश्न आहे – पराभवाचे राजकीय पॅकेजिंग कसे केले जाते? विशेषतः घराणेशाही राजकीय रचनांमध्ये 'पराभवाचे राजकारण' हे नेतृत्वाला जबाबदारीपासून वाचवण्याचे साधन बनते. निरोगी राजकीय व्यवस्थेत एक साधा नियम असतो – विजयाचे श्रेय नेतृत्व घेत असेल, तर पराभवाची जबाबदारीही नेतृत्वाने स्वीकारली पाहिजे. मात्र अनेक घराणेशाही व्यवस्थांमध्ये हे तत्त्व मोडले जाते. निवडणूक जिंकली की नेतृत्व केंद्रस्थानी येते, करिष्म्याचा गौरव होतो आणि घराण्याचा वारसा बळ म्हणून मांडला जातो. पण पराभव झाला की अचानक कथन बदलते. संस्था संशयास्पद ठरतात, व्यवस्था भ्रष्ट ठरते, विरोधक अन्यायकारक ठरतात आणि लोकशाहीच संशयाखाली आणली जाते.

वारंवार होणारे पराभव काही कठोर प्रश्न निर्माण करतात – नेतृत्वाचा जनतेशी संपर्क तुटला आहे का? संघटना कुंठित झाली आहे का? नवीन नेतृत्वाची गरज आहे का? वैचारिक भूमिका कालबाह्य झाली आहे का? कार्यकर्त्यांचा विश्वास कमी झाला आहे का? लोकशाही आणि गुणवत्ताधारित संस्कृतीत हे प्रश्न नैसर्गिक असतात. पण घराणेशाही व्यवस्थांमध्ये हे प्रश्न अस्तित्वाचा प्रश्न बनतात. कारण अशा व्यवस्थेत नेतृत्व ही फक्त संघटनात्मक भूमिका नसते; नेतृत्व म्हणजेच कुटुंबाचा ब्रँड असतो. एकदा हा ब्रँड प्रश्नांकित झाला, की संपूर्ण सत्ताकारण धोक्यात येते.

**– मनोज पोचट**

# भारताला आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात नेणारे 'राजीव'

२१ मे १९९१ ची ती रात्र गांधी कुटुंबिय आणि देशासाठी काळरात्र ठरली. तामिळनाडूमधे श्री पेराम्बदुर येथे प्रचार सभेला जात असतांना एक महिलेच्या कमरेला बांधलेल्या स्फोटकांचा आत्मघातकी हल्ला त्यांच्यावर झाला आणि एका 'राजीव' चा दुर्दैवी मृत्यू झाला. एलटीटीई च्या या हल्ल्याने संपुर्ण देशाला हादरवून सोडले. भारताला आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात घेऊन जाणारा दुरदृष्टीचा नेता म्हणून कै. राजीव गांधी ओळखले जातात. कै. फिरोज गांधी आणि कै. इंदिरा गांधी यांचे जेष्ठ पुत्र असलेले तसेच डुन स्कुल, ट्रिनिट्री कॉलेज (केंब्रिज) ईम्पिरिअल कॉलेज (लंडन) या सारख्या नामांकित शिक्षण संस्थांमधुन शिक्षण घेतलेले कै.राजीव गांधी हे पेशाने विमान पायलट.

माझे कुटुंब माझी जबाबदारी पार पाडणारे राजीव गांधी हे आपल्या संसारात कौटुंबिक आयुष्य जगत असतांनाच अगदी अनपेक्षितपणे कै. इंदिरा गांधी यांच्या दुर्दैवी निधनाने त्यांच्याकडे देशाचे नेतृत्व आले. त्यावेळी पंतप्रधान म्हणून कै. प्रणव मुखर्जी यांचे नाव चर्चेत होते. पण नशिब राजीव गांधी यांच्या बाजुने होते वयाच्या अवघ्या चाळीसाव्या वर्षी देशाचे नेतृत्व त्यांच्या कडे आले.त्या अगोदर आपला लहान भाऊ संजय गांधी यांचे अपघाती निधन झाले होते ते दुखः त्यांना पचवावे लागले. कै. इंदिरा गांधी यांच्या हत्येच्या पार्श्वभूमीवर झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने अब कि बार चारसौ पार पलिकडे जागा मिळवल्या. आपल्या १९८४ - १९८९ या कार्यकाळात त्यांनी आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटविला, आधुनिक तंत्रज्ञानाचा भारत बनविण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान ही त्यांची सर्वात मोठी ऊपलब्धी होती. दुर संचार श्रेत्रात त्यांच्या मुळेच भारतात क्रांती झाली. त्यांच्याच कार्यकाळात युवकांच्या मतदान करता यावे यासाठी २१ वर्षाची मर्यादा कमी करून १८ वर्षे ईतकी करण्यात आली. भारतातील पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा मिळवून देण्यात आणि तिला बळकट करण्यात माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण करून लोकशाही थेट गावपातळीपर्यंत पोहोचवण्याचे त्यांचे स्वप्न होते.

त्यामुळे ऐकविसाव्या शतकातील भारताचा निर्माता म्हणून देखील त्यांना ओळखले जाते .१९९१ साली त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न' पुरस्कार देखील देण्यात आला होता. कै. राजीव गांधी यांना केवळ पाच वर्षे मिळाली मात्र त्यांनी संधीचे सोने केले. विरोधी पक्षनेते कै. अटलबिहारी वाजपेयी यांना परदेशी ऊपचारांची गरज आहे हे ओळखून त्यांनी कै. अटलबिहारी वाजपेयी यांना शिष्टमंडळाचे नेतृत्व देऊन परदेशी पाठवले. राजकिय मतभेत असले तरी टोकाचे मनभेद कधीच बाळगले नाही. त्याच बरोबर केंद्रातून एक रुपया पाठवला



तर खाली पंधरा पैसेच पोहचतात असे त्यांनी प्रांजळपणे कबूल केले होते. डिजिटल क्रांती चा खरा पाया त्यांच्या काळात घातला गेला.जवाहर नवोविद्यालयांची स्थापना त्यांच्याच संकल्पनेतून स्थापन करण्यात आली. महिला आरक्षणाबाबत त्यांनीच आग्रही भूमिका घेतल्यामुळे स्थानिक



**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**मोबा. ९१५८४९५०३७**


स्वराज्य संस्थामधे महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू झाले.

बोफोर्स तोफा खरेदी व्यवहारात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करून त्यांच्या विरोधात रान माजवले गेले. विश्वनाथ प्रताप सिंग तर खिशातून कागद काढून खाते नंबर असल्याचे सांगत होते. या प्रकरणी त्यांचे देखील नाव गोवले गेले मात्र कालांतराने २००४ मधे दिल्लि ऊच्च न्यायालयाने त्यांना क्लिन चिट देण्यात आली. २०११ मधे हा खटला बंद करण्याची परवानगी सिबीआय ला देण्यात आली. भारताने श्रीलंकेत शांतीसेना पाठविली या रागातुन श्रीलंकेत एकदा त्यांच्या वर हल्ला देखील झाला होता आणि अखेर एलटीटीई च्या आत्मघाती पथकाने त्यांची हत्या केलीच.विशेष म्हणजे ज्यांनी कै राजीव गांधी यांना मारले त्या मारेकऱ्यांना मोठ्या मनाने माफ करण्याचा ऊदारपणा गांधी कुटुंबियांनी दाखवली. देश विदेशात त्यांनी आपली छाप पाडली. राजबिंड व्यक्तिमत्व, सालस स्वभाव, कुटुंबवत्सल अशा राजीव गांधी यांच्या आयुष्याची अखेर मात्र एका बॉम्ब स्फोटाने झाली. स्फोटानंतर त्यांच्या शरिराचे तुकडे तुकडे झाले होते ते दृश्य फारच विदारक होते. २१ मे १९९१ रोजी कै. राजीव गांधी आपल्यातुन निघुन गेले मात्र भारतीयांच्या स्मृतीत ते अजुनही आहेत आणि भविष्यात देखील रहातील. कै. राजीव गांधी यांचे अकाली जाणे टळले असते तर आजच्या भारताचे वेगळे चित्र जगात दिसले असते.

# भारतीय माहिती क्रांतीचे जनक राजीव गांधी

आज २१ मे, भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचा आज ३५ वा स्मृतीदिन. राजीव गांधी यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हटले जाते. आधुनिक विचार आणि कठोर निर्णयामुळे राजीव गांधी यांनी जगात भारताची वेगळी ओळख निर्माण केली. २० ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले राजीव गांधी हे भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान होते. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी राजीव गांधी हे भारताचे पंतप्रधान बनले.

भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांचे जेष्ठ सुपुत्र असलेले राजीव यांना राजकारणात रस नव्हता. देशातील सर्वात प्रतिष्ठित राजकीय घराण्यात जन्म घेऊनही राजीव गांधी हे राजकारणापासून दूरच होते. राजीव गांधी यांचे शिक्षण डेहराडूनच्या




शाळेत झाले त्यानंतर ते हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या डुन च्या निवासी शाळेत दाखल झाले. तिथे त्यांना अनेक मित्र भेटले या मित्रांशी त्यांनी आयुष्यभर मैत्री जपली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते केम्ब्रिजच्या ट्रीनीटी महाविद्यालयात गेले पण लवकरच लंडन स्थित इम्पेरियल महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास केला. त्यांना विज्ञान, तंत्रज्ञान या विषयात खूप रस होता. ते या विषयाची पुस्तके वाचून काढत. विमान उड्डाण करून आकाशात उडावे अशी त्यांची इच्छा होती त्यासाठी त्यांनी वैमानिक होण्याचा निर्णय घेतला.

इंग्लंडमध्ये त्यांनी फ्लायिंग क्लबची परीक्षा दिली आणि वैमानिक बनले. लगेचच ते इंडियन एअर लाईन्सचे देशांतर्गत सेवेचे वैमानिक बनले. लंडनमध्येच त्यांची आणि सोनिया गांधी यांची मैत्री झाली मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आणि १९६८ साली त्यांचा विवाह झाला. राजीव गांधी हे अपघातानेच राजकारणात आले. १९८० साली राजीव गांधी यांचे बंधू संजय गांधी यांचा अपघातात मृत्यू झाला. संजय गांधी यांच्या मृत्यूनंतर राजीव गांधी यांनी राजकारणात प्रवेश करावा अशी मागणी काँग्रेस मधील नेत्यांकडून होऊ लागली. आई इंदिरा गांधी यांनीही राजीव गांधी यांना राजकारणात उतरण्याची सूचना केली तेंव्हा राजीव यांनी आपल्या भावाच्या संजय गांधी यांच्या अमेठी या मतदारसंघातुन निवडणूक लढवली व मोठ्या मताधिक्याने ती जिंकली. १९८२ साली दिल्लीत भारताने आशियाई क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धेच्या नियोजनाची सर्व जबाबदारी राजीव गांधी यांच्याकडे होती त्यांनी ती यशस्वीरीत्या पेलून ही स्पर्धा यशस्वी केली. ३१ नोव्हेंबर १९८४ इंदिरा गांधी यांची हत्या झाली. हत्या झाली तेंव्हा इंदिरा गांधी या देशाच्या पंतप्रधान होत्या त्यामुळे मोठा घटनात्मक पेच निर्माण झाला. पंतप्रधानपदासारखे देशातील सर्वोच्च पद जास्त दिवस रिक्त ठेवता येणार नाही असे घटना तज्ज्ञांचे मत होते त्यामुळे त्यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. वैयक्तिक पातळीवर दुःख असूनही त्यांनी पंतप्रधान पदाची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडली.

त्यानंतर झलेल्या निवडणुकीत त्यांनी काँग्रेस पक्षाला एकतर्फी विजय मिळवून दिला. या निवडणुकीत काँग्रेसला ४०० हुन अधिक जागा मिळाल्या. स्वतः राजीव गांधी हे विक्रमी मतांनी जिंकून आले होते. पंतप्रधान असताना त्यांनी देशात अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. देशाला महासत्ता व्हायचे असेल तर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात देशाने प्रगती करायला हवी असे त्यांचे मत होते. २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे असेल त्यासाठी देशातील प्रत्येक तरुण हा संगणक साक्षर असायला हवा असा त्यांचा आग्रह होता त्यामुळेच त्यांनी देशात संगणक आणला. राजीव गांधी जेंव्हा संगणकावर बोलत होते तेंव्हा अनेकजण त्यांच्यावर टीका करत होते. पण संगणक क्रांती आणणार हा ध्यास त्यांनी घेतला होता. राजीव गांधींमुळेच सर्वसामान्य घरात संगणक पोहचला. राजीव गांधी यांनी घेतलेल्या एका निर्णयामुळे ८ टक्के म्हणजे तेरा लक्ष कोटींचा माहिती तंत्रज्ञान उद्योग उभा राहिला. यातून पन्नास लाख लोकांना थेट रोजगार मिळतो आहे. माहिती प्रधान सभ्यता, ज्ञान प्रधान सभ्यता, बुद्धिमत्ता प्रधान सभ्यता या तीन क्रांतीची पायाभरणी राजीव गांधी यांनी केली. त्याचीच फळे आज भारत देश चाखतो आहे. राजीव गांधी यांच्या दुरदृष्टीमुळे भारताचा वेगाने विकास झाला आणि लोकांचे जीवनमान उंचावले. स्वभावाने गंभीर पण आधुनिक विचाराच्या राजीव गांधी यांनी देशात माहिती तंत्रज्ञान युगाची मुहूर्तमेढ रोवली त्यामुळेच त्यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हणतात. राजीव गांधी यांनी दूरसंचार क्रांती बरोबरच नवे शैक्षणिक धोरण आणून देशभरात नवोदय विद्यालयाची स्थापना केली. त्यासोबतच पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून महिलांना राजकारणात मोठी संधी दिली. राजीवजींनी घेतलेले हे निर्णय भारताच्या जडणघडणीत आणि विकासात मैलाचा दगड ठरले आहेत. भारत देशाला राजीव गांधी यांनी तंत्र वैज्ञानिक दृष्टी दिली. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील महाशक्ती बनवून भारताला स्वाभिमान दिला. पुढच्या पन्नास वर्षाचा अर्थव्यवस्थेचा पाया राजीव गांधी यांनी त्यावेळेला रचला होता त्यामुळेच आपण आज इथपर्यंत पोहचू शकलो. देशाला माहिती तंत्रज्ञानात परिपूर्ण करून महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या पंतप्रधानाचे २१ मे १९९१ रोजी लिट्टे या दहशतवादी संघटनेने मानवी बॉम्बचा वापर करून हत्या केली म्हणून आजचा दिवस देशभर दहशतवादी विरोधी दिवस म्हणूनही पाळण्यात येतो. राजीव गांधी यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## पाठीशी

आपत्तीत संकटांत
उभे राहून पाठीशी
चुका गुन्हे पापसारे
सहजघाले पाठीशी

सोडवेघोटाळ्यांतून
अनुभव ते गाठीशी
अंगावरी रे चौकशी
दुश्मनीघेई काठीशी

मीचं करे तुरूंगवारी
मित्रत्वजडे लाठीशी
मल्लम्हणून भिडलो
मरणवेदना मिठीशी

वेदना तळमळे जसे
घट्टधरले मी पोटाशी
सुधा वर्षाव तुम्हांवर
विषद्रव्ये घे ओठांशी

पुरावे माझ्या नावाने
ठसेजुळतात बोटाशी
गोळा करता खंडणी
इमानराखले नोटांशी

बाहेर मीचं पहारेकरी
चर्चा आतल्यागटाशी
बिंग फोडले फितुरांचे
सामीलहोवून कटाशी

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# भारताच्या संरक्षणासाठी 'श्री राजमातंगी यज्ञ'

दादर येथील श्री सिद्धिविनायक मंदिराच्या बाजूच्या मैदानात १७ मे रोजी 'श्री राजमातंगी महायज्ञ' संपन्न झाला. याच्या अनेक जाहिराती दादर परिसरात झळकत होत्या, त्या पाहून अनेक भाविक या यज्ञाला उपस्थित राहिले. सतिमाता जेव्हा अग्नित समर्पित झाली तेव्हा अग्नितुन बाहेर पडलेल्या दहा शक्तिपैकी दुसरी शक्तिरूप म्हणजेच 'श्री राजमातंगी देवी'. या रूपाचे वैशिष्ट्य असे की ही देवी राजाला राजशासन करण्यास, राज्याच्या सुरक्षितता व समृद्धी यांसाठी योग्य निर्णय घेण्याचे बळ आणि बुद्धी देते.

श्रीरामाच्या काळात या देवीचे तत्व मोठ्या प्रमाणात कार्यरत होते. त्यामुळे तेव्हाचे रामाचे शासन




हे सुशासन होते. आज अनाचार, भ्रष्टाचार यांना कंटाळलेली जनता 'रामराज्य' पुन्हा यावे याचीच वाट पाहत आहे. भारताच्या सीमेवरील अस्थिर, कुरापतखोर बांगलादेश, आतंकी पाकिस्तान तसंच जागतिक युद्ध भडकण्याची शक्यता यांच्या पार्श्वभूमीवर भारताचे संरक्षण व्हावे, संरक्षण दलाला योग्य निर्णय घेऊन ते अमलात आणण्याचे बळ, बुद्धी मिळावी यासाठी देवीचे तत्व पुन्हा कार्यरत होण्याची गरज निर्माण झाली आहे. पूर्वी राजेही इच्छित कार्यपूर्तीसाठी, युद्धापूर्वी यज्ञ करून त्यांच्या प्रजेची मंगलकामना करत. राजसूय यज्ञ, अश्वमेध यज्ञ सर्वश्रुत आहेतच.

याच धर्तीवर सध्या मुंबईच्या पवित्र सिद्धिविनायकच्या आशीर्वादाने संपन्न झालेला हा 'श्री राजमातंगी महायज्ञ' महत्वाचा ठरला.

**– स्वाती हरेर, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# माझं माथेरान.... माझा अभिमान

## १७६ व्या वाढदिवसानिमित्त माथेरानचा इतिहास वर्तमान आणि भविष्य




**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२०, माथेरान :** सह्याद्रीच्या कुशीत विसावलेलं, हिरवाईने नटलेलं आणि धुक्याच्या शुभ्र चादरीत हरवून जाणारं माथेरान आज १७६ वा वाढदिवस साजरा करत आहे. महाराष्ट्राचं एकमेव वाहनमुक्त पर्यटनस्थळ म्हणून ओळख असलेलं माथेरान हे केवळ डोंगररांगांमधील सुंदर गाव नाही, तर इतिहास, संस्कृती, निसर्ग आणि मानवी जिद्दीचं प्रतीक आहे. माझं माथेरान माझा अभिमान ही भावना प्रत्येक माथेरानकराच्या मनात खोलवर रुजलेली आहे. इ.स. १८५० मध्ये तत्कालीन ठाण्याचे जिल्हाधिकारी ह्यू पॉईंट्झ मॅलेट यांनी माथेरानचा शोध लावला आणि त्यानंतर ब्रिटिशांनी येथील थंड हवामान, हिरवाई आणि शांत वातावरण पाहून या ठिकाणाचा हिल स्टेशन म्हणून विकास सुरू केला.

माथेरान म्हणजे माथ्यावरचं जंगल असा अर्थ असून समुद्रसपाटीपासून सुमारे ८०० मीटर उंचीवर वसलेलं हे ठिकाण आजही निसर्गसंपन्न त्यामुळे पर्यटकांना आकर्षित करते. माथेरानच्या चारही बाजूंना दऱ्या, घनदाट जंगल आणि लाल मातीचा प्रदेश आहे. येथे दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो.

धुक्याचे पडदे, ओढे, झरे आणि विविध जैवविविधतेमुळे माथेरान हे पर्यावरणीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील क्षेत्र मानलं जातं. येथे आढळणाऱ्या दुर्मिळ वनस्पती, पक्षी आणि प्राणी यामुळे माथेरान केवळ पर्यटनस्थळ नसून पर्यावरण संवर्धनाचं जिवंत उदाहरण ठरतं. माथेरानची खरी ओळख म्हणजे येथील वाहनबंदी. पूर्वीपासून येथे घोडे आणि हाताने ओढल्या जाणाऱ्या रिक्षा हेच प्रमुख प्रवासाचे साधन होते. अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह आजही घोडेस्वारी आणि हात रिक्षांवर चालतो.

काळ बदलला तसे आधुनिकतेची चाहूल लागली आणि आता ई-रिक्षांचा पर्याय पुढे येत आहे. पर्यावरणाला हानी न पोहोचवता प्रवास अधिक सोयीस्कर करण्याचा प्रयत्न सुरू असला तरी विकास करताना माथेरानची मूळ ओळख जपणं तितकंच आवश्यक आहे. ब्रिटिश काळात श्रीमंत अधिकारी आणि व्यापाऱ्यांसाठी प्रसिद्ध असलेलं माथेरान आता सर्वसामान्य पर्यटकांचे आवडते पर्यटन स्थळ बनलं आहे. चार्लोट लेक, पॅनोरमा पॉईंट, इको पॉईंट, लुईसा पॉईंट, वन ट्री हिल यासारखे ठिकाणं आजही पर्यटकांना भुरळ घालतात.

माथेरानची मिनी ट्रेन ही येथील ऐतिहासिक ओळख असून डोंगर-दऱ्यांतून धावणारी ही ट्रेन पर्यटकांसाठी विशेष आकर्षण आहे. पर्यटनामुळे येथील हॉटेल व्यवसाय, घोडेवाले, हातरिक्षाचालक, दुकानदार, फोटोग्राफर आणि छोटे व्यावसायिक यांना रोजगार मिळतो.

माथेरानमध्ये पर्यटन हाच मुख्य व्यवसाय असून अनेक कुटुंब पिढ्यानपिढ्या पर्यटकांवर आधारित व्यवसाय करत आहेत. येथील लोक साधे, प्रेमळ आणि मेहनती आहेत. पर्यटकांना मदत करणं आणि पाहुणचार करणं ही माथेरानची परंपरा आहे. डोंगराळ भाग असूनही माथेरानमध्ये शिक्षणाची चांगली परंपरा आहे. अनेक विद्यार्थी कठीण परिस्थितीत शिक्षण घेत असून पावसाळ्यात वाहतुकीच्या अडचणी, मर्यादित सुविधा असूनही विविध क्षेत्रात यश मिळवत आहेत. पूर्वी माथेरान अधिक शांत, स्वच्छ आणि निसर्गाच्या जवळ होतं.

आज पर्यटन वाढलं, सुविधा वाढल्या, व्यवसाय वाढले; पण त्याचबरोबर प्लास्टिक कचरा, अतिक्रमण आणि पर्यावरणीय ताणही वाढू लागला आहे. त्यामुळे विकासाबरोबर पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य देणं ही काळाची गरज बनली आहे. भविष्यातील माथेरान हे पूर्णपणे स्वच्छ, प्लास्टिक मुक्त, पर्यावरणपूरक आणि शिस्तबद्ध पर्यटनस्थळ असावं, अशी प्रत्येक माथेरानकराची अपेक्षा आहे.

स्थानिक युवकांना रोजगार, घोडेवाले आणि हातरिक्षाचालकांना सुविधा, उत्तम आरोग्य व शिक्षण व्यवस्था आणि ऐतिहासिक वारसा जपत विकास होणं आवश्यक आहे. १७६ वर्षांचा हा प्रवास केवळ एका पर्यटनस्थळाचा इतिहास नाही, तर हजारो माथेरानकरांच्या संघर्ष, परंपरा आणि अभिमानाचा प्रवास आहे.

सह्याद्रीच्या कुशीतलं हे नंदनवन पुढील पिढ्यांसाठी तितकंच सुंदर आणि स्वच्छ राखणं ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. धुक्याच्या थंड सरींमध्ये हरवुन जाणारं, घोड्यांच्या टापांमध्ये इतिहास जपणारं, निसर्गाच्या कुशीत फुललेलं **माझं माथेरान, माझा अभिमान!**

# थोडक्यात

## ऑनलाईन औषध विक्री विरोधातील बंदला पारनेरकरांचा पाठिंबा

### अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे तहसीलदारांना निवेदन




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री आणि कॉर्पोरेट कंपन्यांकडून होत असलेल्या अव्यावसायिक स्पर्धेविरोधात अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने बुधवार, दिनांक २० मे २०२६ रोजी संपूर्ण औषध विक्रेता संघटनेने पुकारलेल्या देशव्यापी बंदला पारनेरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तालुक्यातील सर्व विक्रेत्यांनी दुकाने बंद ठेवल्याची माहिती संघटनेचे तालुकाध्यक्ष शैलेंद्र औटी यांनी दिली. देशभरातील तब्बल १२.५० लाख औषध विक्रेत्यांनी या बंदमध्ये सहभाग घेतल्याचा दावा ही यावेळी संघटनेकडून करण्यात आला. संघटनेच्या वतीने बुधवार, दि.२० मे २०२६ रोजी पारनेर बसस्थानकापासून तहसीलदार कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात आला.

यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर, सचिव आबासाहेब बेंद्रे, सुदर्शन लोढा, प्रसाद सोनवळे निलेश झावरे यांच्यासह शेकडो औषध विक्रेते आणि पदाधिकारी सहभागी झाले होते. शैलेंद्र औटी यांनी सांगितले की, औषध व्यवसाय हा ड्रग्स अँड कॉस्मेटिक्स ॲक्ट १९४० आणि रूल १९४५ अंतर्गत नियंत्रित केला जातो. मात्र, ऑनलाईन औषध विक्रीबाबत अद्याप स्पष्ट कायदेशीर तरतूद नसतानाही देशभरात मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन विक्री सुरू आहे. या प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल असून न्यायालयाने ऑनलाईन औषध विक्रीस स्थगिती दिलेली असतानाही शासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप त्यांनी केला.

## आरोग्य संदर्भात विविध निवेदनपर प्रश्नांवर सखोल चर्चा




**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.२०, लोकमान्य नगर (ठाणे) :** नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून सर्वतोपरी उपाययोजना करून सुविधा पुरवण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. असे ठाणे महानगरपालिका सभागृह नेते व ज्येष्ठ नगरसेवक हणमंत जगदाळे यांनी म्हटले, दृष्टीकोनातून आरोग्या संदर्भातील विविध निवेदनपर प्रश्नांवर आज सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी प्रभाग क्रमांक ६, १४ आणि १८ येथील स्व. मीनाताई ठाकरे प्रसूतीगृह, शिवाजीनगर येथील गरजू माता व बालकांसाठी पोषक आहार योजना सुरू करणे, कोरस येथील निर्मलादेवी चिंतामणी दिघे रुग्णालयातील दंत चिकित्सा विभाग पूर्ण क्षमतेने म्हणजे एक्स-रे सुविधा व एछढ विभाग उढीलरप व सोनोग्राफी सुरू करणे आणि कोरस रुग्णालय व अ.ग.जोशी प्रसूतीगृह यांच्या इमारतींच्या नूतनीकरण व विस्तारीकरणासाठी आवश्यक निधी मंजुरीबाबत सखोल चर्चा करण्यात आली. असेही हणमंत जगदाळे बोलले यावेळी नगरसेवक दिलीप बारटक्के, नगरसेवक अनिल भोर, नगरसेवक दिपक वेतकर, सहकारी नगरसेवक प्रशांत जाधवर, सहकारी नगरसेविका वनिता घोगरे, सहकारी नगरसेविका सरिता ठाकूर, मा. नगरसेवक दिगंबर ठाकूर यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# साई सावली हॉस्पिटलच्या शासकीय आरोग्य योजनांचे लोकार्पण

## शासनाच्या जन आरोग्य योजना सर्वसामान्यांना दिलासादायक - राधाकृष्ण विखे




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** आज धकाधकीच्या युगात बहुतेकांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे विविध आजारांना निमंत्रण दिले जात आहे. असे अनेक आजार आहेत की ज्यावर सर्व सामान्य माणसाला महागडे उपचार घेणे परवडत नाही. त्यामुळे केंद्र व राज्य शासनाने विविध आरोग्यदायी योजना सुरू केल्या आहेत. या सर्व योजना साई सावली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असून त्याच्या सर्वसामान्य माणसाला मोठा लाभ होत आहे, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

टाकळी ढोकेश्वर (ता.पारनेर) येथील साई सावली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल तसेच विविध शासकीय आरोग्य योजना व हिमोफिलिया ट्रीटमेंट सेंटरचा लोकार्पण सोहळा मंत्री विखे यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आमदार काशिनाथ दाते हे होते. स्वागत व प्रास्तविक करताना साई सावलीचे चेअरमन डॉ.भाऊसाहेब खिलारी यांनी सर्व योजनांची माहिती दिली. परिसरातील कोणत्याही रुग्णांना आर्थिक अडचणीमुळे उपचार अडू नये हा आमचा प्रयत्न असतो.

यावेळी जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी, आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.बाळासाहेब बांडे, आयुष्यमान भारत योजनेचे जिल्हा प्रमुख डॉ. अनिकेत भालसिंग, विनायक देशमुख, माजी जिल्हा परिषद सदस्य विश्वनाथ कोरडे, वसंत चेडे, राहुल शिंदे, प्रशांत गायकवाड, माजी सरपंच शिवाजी खिलारी, खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन बाबासाहेब खिलारी, अशोक फडके, विलास झावरे, नारायण झावरे, साई सावली चे उपाध्यक्ष डॉ.शौकत सय्यद, संचालक डॉ.स्वाती खिलारी, डॉ.संतोष ढवळे, डॉ.मुकेश ठुबे, डॉक्टर विजय पुरी, डॉक्टर जयवंत निमसे, डॉक्टर तुषार धुमाळ व परिसरातील सर्व गावांमधील विविध क्षेत्रातील पदाधिकारी व रुग्ण उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉक्टर भाऊसाहेब खिलारे यांनी केले व आभार प्रदर्शन भाऊसाहेब हिंगडे सरांनी केले. यानिमित्ताने ग्रामीण भागात पहिल्यांदाच अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध होणार असल्याने परिसरामधील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.




**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२०, माथेरान :** आजच्या आधुनिक जीवनशैलीत वापरा आणि फेकून द्या ही सवय इतकी वाढली आहे की, नकळत पर्यावरणावर त्याचे गंभीर परिणाम होत आहेत. प्लास्टिकचा वाढता वापर, साचणारा कचरा आणि नैसर्गिक साधनसंपत्तीवर वाढणारा ताण यामुळे पर्यावरणाचे संतुलन धोक्यात आले आहे. त्यामुळे आता केवळ घोषणांपेक्षा प्रत्यक्ष कृती आणि सवयींमध्ये बदल करणे आवश्यक असल्याचे मत पर्यावरण प्रेमी आणि सामाजिक कार्यकर्ते व्यक्त करत आहेत.

सवयी बदलल्या तरच प्लास्टिकमुक्त भविष्य शक्य हा संदेश देत माथेरानमधील विविध सामाजिक संस्था नागरिकांमध्ये जनजागृती करत आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी केवळ शासन किंवा नगरपालिका जबाबदार नसून प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या घरातून बदलाची सुरुवात करणे गरजेचे असल्याचे आवाहन करण्यात येत आहे अनेक घरांमध्ये बाजारातून आणलेल्या प्लास्टिक किंवा एनडब्ल्यूपीपीच्या पिशव्या जमा होत जातात. त्या लगेच फेकून दिल्या जात नाहीत, मात्र त्यांचा पुनर्वापरही केला जात नाही. कपाट, ड्रॉवर किंवा घराच्या कोपऱ्यात पडून राहणाऱ्या या पिशव्या पुढे मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक कचऱ्याचे कारण ठरतात. पर्यावरणाची हानी एखाद्या मोठ्या चुकीमुळे होत नाही, तर लाखो लोकांच्या छोट्या-छोट्या निष्काळजी सवयींमुळे ती वाढत जाते, असे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. यासंदर्भात त्यांनी पाण्याचे उदाहरण देत सांगितले की, घरातील नळातून गळणारा एक थेंब सुरुवातीला किरकोळ वाटतो, पण तोच थेंब सतत गळत राहिला तर हजारो लिटर पाणी वाया जाते. त्याचप्रमाणे एक प्लास्टिकची पिशवी किंवा एक छोटी निष्काळजी सवय तात्काळ गंभीर वाटत नाही; मात्र लाखो लोक रोज तसेच करत राहिले, तर पर्यावरणावर त्याचा मोठा परिणाम होतो. आज अनेकांना पाणी वाचवणे म्हणजे फक्त नळ बंद ठेवणे एवढेच वाटते. मात्र प्रत्यक्षात प्लास्टिक उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी, वीज आणि इंधन वापरले जाते. त्यामुळे प्लास्टिकचा अनावश्यक वापर कमी करणे, उपलब्ध पिशव्यांचा पुनर्वापर करणे आणि कचरा कमी करणे हे देखील अप्रत्यक्षपणे पाणी वाचवण्यासारखेच असल्याचे त्यांनी नमूद केले.दरम्यान, माथेरान नगरपालिकेने स्वच्छता आणि प्लास्टिक मुक्त शहरासाठी नागरिकांना सहकार्याचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत माथेरान कोकणवासीय समाज संस्थेच्या वतीने समाज बांधवांमध्ये जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे. घरातील वापरण्यायोग्य पिशव्या पुन्हा गोळा करणे, स्वच्छ ठेवणे आणि त्यांचा पुनर्वापर करणे यासाठी नागरिकांना प्रोत्साहित केले जात आहे. हा उपक्रम केवळ पिशव्यांपुरता मर्यादित नसून वस्तूकडे पाहण्याची दृष्टी बदलण्याचा प्रयत्न असल्याचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. याशिवाय वेसॅक इंडिया आणि 'आशा ईन' या संस्थांच्या माध्यमातून विजयकुमार कट्टी हे समाजामध्ये पर्यावरण संवर्धनाचा संदेश पोहोचवत आहेत. त्यांच्या या कार्यात माथेरान कोकणवासीय समाज संस्थाही सक्रिय सहभाग घेत आहे.जर प्रत्येकाने फक्त एक प्लास्टिकची पिशवी पुन्हा वापरण्याचा निर्धार केला, तर लाखो पिशव्या कचऱ्यात जाण्यापासून वाचू शकतात. छोट्या सवयी बदलल्या तरच मोठा पर्यावरणीय बदल घडू शकतो, असा संदेश या उपक्रमातून देण्यात येत आहे.

## रिक्षा टॅक्सी बॅच परमिटची फेरतपासणी होणार

**अक्षराज : गणेश जाधव**

**दि.२०, नेरूळ (नवी मुंबई) :** महाराष्ट्र परिवहन विभागाने बनावट कागदपत्रे आणि अनधिकृत परवान्यांना आळा घालण्यासाठी सर्व ऑटो रिक्षा आणि टॅक्सी परवान्यांचीफेरतपासणी (Re-verification) सुरू केली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर कडक कारवाई केली जात आहे.

**या मोहिमेची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :-**

कागदपत्रांची फेरतपासणी:बनावट कागदपत्रे सादर करून मिळवलेले परवाने रद्द करण्यासाठी परिवहन विभागाने 'वायुवेग' पथक (Vayuveg Squad) नेमले आहे. मोटार वाहन कायद्यानुसार सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी करून परवान्यांची पडताळणी केली जात आहे. मराठी भाषेची सक्ती:परवानाधारक रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे (लिहिणे, वाचणे आणि बोलणे) अनिवार्य करण्यात आले आहे.

दंड व परवाना रद्द:परवाना फेरतपासणी दरम्यान ज्या चालकांना मराठी भाषा अवगत नसल्याचे किंवा कागदपत्रे बोगस असल्याचे आढळल्यास सुरुवातीला दंड आणि त्यानंतर थेटपरवाने रद्दकरण्याची कारवाई करण्यात येत आहे.

परिवहन विभागाने १५ ऑगस्ट पर्यंत अहवाल सादर करण्याचे निर्देश परिवहन कार्यालयांना देण्यात आलेले आहेत.

# डिझेल टंचाईमुळे सोयगाव तालुक्यातील शेतकरी संकटात; मशागतीची कामे ठप्प होण्याची भीती



**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.२०, सोयगाव :** सध्या सोयगाव शहरासह संपूर्ण तालुक्यात शेतीच्या मशागतीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू असून शेतकरी आधुनिक युगात ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतीची कामे करत आहेत. मात्र महाराष्ट्रासह देशभरात निर्माण झालेल्या आर्थिक परिस्थितीमुळे पेट्रोल आणि डिझेलच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. परिणामी अनेक पेट्रोल पंपांवर डिझेलचा तुटवडा जाणवत असून शेतकरी बांधव मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

सध्या प्रशासनाच्या आदेशानुसार ट्रॅक्टरमध्ये केवळ २० लिटर तर मोठ्या वाहनांमध्ये २०० लिटर डिझेल देण्याचे निर्देश पेट्रोल पंप चालकांना देण्यात आले आहेत. मात्र शेतीची मशागत, नांगरणी, पेरणीपूर्व तयारी यासाठी ट्रॅक्टरला मोठ्या प्रमाणात डिझेलची आवश्यकता असते. त्यामुळे २० लिटर डिझेलमध्ये शेतकरी शेतीची मशागत कशी करणार? असा सवाल शेतकरी बांधवांकडून उपस्थित केला जात आहे.

सोयगाव शहरातील प्रतिष्ठित शेतकर डॉक्टर नाना पायघन यांनी सांगितले की, शेतकऱ्यांसाठी हा अत्यंत महत्त्वाचा हंगाम आहे. मशागतीची कामे वेळेत झाली नाहीत तर पेरणीवर परिणाम होईल. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांना विशेष सवलत देऊन अधिक डिझेल उपलब्ध करून द्यावे. दरम्यान भारत पेट्रोलियम तसेच ओम साई पेट्रोल पंपाच्या मालकांशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, माननीय जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आम्हाला डिझेल-पेट्रोलचे मर्यादित वाटप करण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत. उपलब्ध साठा सर्वांना मिळावा यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने इंधन वाटप केले जात आहे.

संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क करण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र संपर्क होऊ शकला नाही. शिंदे शिवसेनेचे रमेश गव्हांडे यांनी प्रशासनाकडे मागणी करताना सांगितले की, शेतकरी बांधवांची अडचण लक्षात घेऊन तहसील प्रशासनाने ट्रॅक्टरसाठी स्वतंत्र डिझेल कोटा किंवा विशेष व्यवस्था तातडीने उपलब्ध करून द्यावी. डिझेल टंचाईमुळे सध्या अनेक गावांतील शेतकऱ्यांची मशागतीची कामे खोळंबली असून, वेळेत पाऊस आल्यास पेरणीवर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने लक्ष घालून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

> ● जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार आम्ही मर्यादित प्रमाणात डिझेल वाटप करत आहोत. उपलब्ध साठा सर्व शेतकरी व वाहनधारकांना मिळावा यासाठी नियोजन केले जात आहे. डिझेलचा पुरवठा नियमित झाल्यानंतर परिस्थिती पूर्ववत होईल.
> **– योगेश पाटील,**
> **भारत पेट्रोलियम पंप मालक, सोयगाव.**

# खा.बजरंग सोनवणे यांच्या प्रयत्नांना मोठे यश

## गेवराई तालुक्यातील 'एमडीआर-२० ते यमगरवाडी' रस्ता कामाला मंजुरी

> ग्रामीण भागाचा विकास करायचा असेल तर तिथले रस्ते सक्षम असणे गरजेचे आहे. यमगरवाडी रस्त्याचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित होता. यासाठी मी वैयक्तिक पातळीवर सातत्याने केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाकडे पाठपुरावा करत होतो. अखेर या प्रयत्नांना यश आले असून, १३७.२९ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. मतदारसंघातील एकही गाव रस्त्याविना वंचित राहणार नाही, यासाठी माझे प्रयत्न सातत्याने सुरू राहतील.
> **– खा.बजरंग सोनवणे, बीड लोकसभा.**



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२०, बीड :** गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांचा आणि दळणवळणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी लोकप्रतिनिधींकडून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर गेवराई तालुक्यासाठी एक अत्यंत आनंदाची आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. तालुकयातील ड०२१ एम डीआर-२० ते यमगरवाडी या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामाला अखेर 'प्रधानमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-४' (PMGSY-IV) अंतर्गत प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. बीडचे खा. बजरंग सोनवणे यांच्या सातत्यपूर्ण आणि प्रामाणिक प्रयत्नांना यामुळे मोठे यश आले असून, या रस्त्यासाठी १ कोटी ३७ लक्ष २९ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने (नवी दिल्ली) १८ मे २०२६ रोजी या कामाला अधिकृत मंजुरी दिली असून, यामुळे परिसरातील ग्रामस्थांची अनेक वर्षांची मोठी अडचण दूर होणार आहे.

गेवराई तालुक्यातील एमडीआर-२० ते यमगरवाडी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने शेतकऱ्यांना शेतमाल बाजारात नेण्यासाठी, विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी आणि रुग्णांना रुग्णालयात नेण्यासाठी प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत होता. या रस्त्याचे खडीकरण आणि डांबरीकरण व्हावे, अशी आग्रही मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून केली जात होती.ग्रामस्थांची हीच गरज ओळखून खासदार बजरंग सोनवणे यांनी दिल्ली दरबारी आणि संबंधित मंत्रालयाकडे या रस्त्याच्या मंजुरीसाठी विशेष पाठपुरावा केला होता. अखेर काल, १८ मे रोजी केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने या कामावर मंजुरीची मोहोर उमटवली. या एकूण १.४०० कि.मी. अंतराच्या रस्त्याचे काम आता पूर्णपणे दर्जेदार आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून केले जाणार आहे.

**ग्रामस्थांकडून जल्लोष आणि आभार**

या रस्त्याला मंजुरी मिळाल्याची बातमी समजताच यमगरवाडी आणि परिसरातील ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे. अनेक वर्षांचा रखडलेला प्रश्न मार्गी लावल्याबद्दल गावकऱ्यांनी खा.बजरंग सोनवणे यांचे विशेष आभार मानले आहेत. रस्ता मंजुरीमुळे आता या भागातील वाहतूक सुसाट होणार असून, परिसराच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला मोठी गती मिळणार आहे. या कामाचे भूमिपूजन लवकरच मान्यवरांच्या उपस्थितीत दिमाखात पार पडणार आहे.

# परभणी-हिंगोली विधान परिषदेत शिवसेनेची ताकद वाढवण्यासाठी सईद खान यांना संधी देण्याची मागणी

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२०, परभणी :** महाराष्ट्रात विधान परिषद निवडणुकीची राजकीय रणधुमाळी सुरू झाली असून महायुती आणि महाविकास आघाडीने जोरदार रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. परभणी-हिंगोली विधान परिषद मतदार संघात सध्या राजकीय समीकरणे वेगाने बदलताना दिसत असून विविध पक्षांकडून उमेदवारांच्या नावांची चाचपणी सुरू आहे.

समोर आलेल्या पक्षीय बलाबलाच्या आकडेवारीनुसार परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे १३१ सदस्य, भाजपचे ९९, काँग्रेसचे ५९, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे ४३ तर शिवसेना शिंदे गटाचे ७७ सदस्य असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या मतदारसंघात महायुतीसाठी योग्य उमेदवार निवडणे अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. राजकीय वर्तुळात शिवसेना शिंदे गटाकडून आनंद भरोसे, विप्लव बजोरिया आणि सईद खान यांच्या नावांची चर्चा सुरू असून त्यामध्ये सईद खान यांचे नाव विशेष चर्चेत आले आहे. अल्पसंख्याक समाजामध्ये मजबूत जनसंपर्क, संघटन कौशल्य आणि पक्षासाठी सातत्याने केलेले काम यामुळे त्यांना एक प्रभावी चेहरा म्हणून पाहिले जात आहे. राजकीय जाणकारांच्या मते, जर उपमुख्यमंत्री तथा शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी सईद खान यांना विधान परिषदेसाठी उमेदवारी दिली तर त्याचा मोठा राजकीय संदेश संपूर्ण महाराष्ट्रात जाऊ शकतो. मुस्लिम समाजामध्ये शिवसेनेबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण होऊन भविष्यात पक्षाला मोठा राजकीय फायदा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



सईद खान हे अल्पसंख्याक समाजातील एक अभ्यासू आणि सक्रिय नेतृत्व म्हणून ओळखले जातात. गेल्या काही वर्षांत त्यांनी शिवसेना पक्ष वाढविण्यासाठी मुस्लिम समाजात मोठ्या प्रमाणात जनसंपर्क मोहीम, सामाजिक कार्यक्रम आणि संघटनात्मक काम केले आहे. त्यामुळे ते एकनाथ शिंदे यांच्या जवळच्या विश्वासू कार्यकर्त्यांपैकी एक मानले जातात. परभणी आणि हिंगोली या दोन्ही जिल्ह्यांमध्ये अल्पसंख्याक समाजाचे मोठे मतदान लक्षात घेता सईद खान यांची उमेदवारी ही केवळ एका व्यक्तीची निवड न राहता भविष्यातील मोठ्या राजकीय समीकरणांची सुरुवात ठरू शकते, अशी चर्चा आता जोर धरू लागली आहे.

शिवसेनेला ग्रामीण भागासह अल्पसंख्याक समाजात अधिक मजबूत करण्यासाठी नवीन आणि समाजात काम करणाऱ्या चेहऱ्यांना संधी देणे गरजेचे असल्याची भावना अनेक कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे. त्यामुळे परभणी आणि हिंगोली विधान परिषद मतदार संघासाठी सईद खान यांना उमेदवारी मिळावी, अशी मागणी आता वेगाने पुढे येत आहे.

# वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची निवडणूक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची निवडणूक येत्या १८ जून २०२६ रोजी होणार आहे. त्यासाठी या तिन्ही जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेचे ९७७ कार्यरत सदस्य मतदानाचा हक्क बजावणार आहेत. वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली या तिन्ही जिल्ह्यात १८ मे पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली असून, या आचारसंहितेचे सर्वांनी पालन करावे, असे आवाहन निवडणूक



निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी येथे पत्रपरिषदेत केले. जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणुकीबाबत त्या माहिती देत होत्या. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी संजीव देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार उपस्थित होते.

चंद्रपूर जिल्ह्यातील ४६९ सदस्य, त्याखालोखाल वर्धा जिल्ह्यातील २६४, तर गडचिरोली जिल्ह्यातील २४४ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सदस्यांचा समावेश आहे. या निवडणुकीकरीता चंद्रपूर महानगरपालिकेचे ६६ सदस्य तसेच जिल्ह्यातील १० नगर परिषदा आणि ७ नगर पंचायतीचे एकूण ४०३ असे चंद्रपूर जिल्ह्यातील ४६९ मतदार, गडचिरोली जिल्ह्यातील ३ नगर परिषदा आणि ९ नगर पंचायतींचे एकूण २४४ मतदार तर वर्धा जिल्ह्यातील १० नगर परिषदांचे एकूण २६४ मतदार आहेत. तर चंद्रपूर, गडचिरोली आणि वर्धा येथील जिल्हा परिषदांच्या सदस्यांची संख्या शुन्य आहे. कारण त्या ठिकाणी सद्यस्थितीत लोकप्रतिनिधी नाहीत. या निवडणुकीकरीता प्रत्येक जिल्ह्यातील उपविभागाच्या मुख्यालयी एक याप्रमाणे १७ मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहे. तसेच मतमोजणी चंद्रपूर जिल्हा स्तरावर करण्यात येणार आहे. या निवडणुकीवर लक्ष ठेवण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोग यांच्याकडून स्वतंत्र निवडणूक निरीक्षक यांची नियुक्ती केली जाणार असल्याचे पंत यांनी सांगितले.

# थोडक्यात

## खतांचा संतुलित वापर जागरूकता अभियान २०२६ अंतर्गत विद्यापीठातील शास्त्रज्ञांचे शेतकरी मेळाव्यात मार्गदर्शन



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२०, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी विद्यापीठ, दि. २० मे, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकर्यांमध्ये खतांचा संतुलित वापर याविषयी जागरूकता निर्माण व्हावी या उद्देशाने अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील मृदाशास्त्र विभाग व आंतरविद्या शाखा जलसिंचन व्यवस्थापन विभागामार्फत श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मृदाशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.भीमराव कांबळे, आंतरविद्याशाखा जलसिंचन व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. विजयकुमार पाटील, मृदा शास्त्रज्ञ डॉ. आनंद जाधव, डॉ. सुभाष घोडके, डॉ. गणेश शेळके, जलसिंचन आणि निचरा अभियंता डॉ. देविदास खेडकर व कृषि अधिकारी श्रीमती पौर्णिमा गाढे उपस्थित होते.

यावेळी डॉ. भीमराव कांबळे यांनी आगामी खरीप हंगामात युरिया व इतर रासायनिक खतांना पर्यायी उपाय काय करता येतील याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. विजयकुमार पाटील यांनी पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार अन्नद्रव्ये व्यवस्थापनाबाबत माहिती दिली. डॉ. आनंद जाधव यांनी माती परीक्षण अहवालाधारित आणि अपेक्षित पीक उत्पादन सूत्रांच्या आधारे शेतकर्यांनी विविध पिकांसाठी खतांच्या मात्रा कशा द्याव्यात याबाबत मार्गदर्शन केले. डॉ.सुभाष घोडके यांनी ऊस पिकासाठी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करताना ऊस पिकासाठी खतांचे वेळापत्रक, सरळ रासायनिक खते उपलब्ध नसल्यास पर्यायी संयुक्त खते कोणती वापरावीत, रासायनिक खतांचा वापर कमी करून अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी कंपोस्ट खते, हिरवळीचे खते, जिवाणू खाते इत्यादी खतांचा एकात्मिक वापर करून अपेक्षित उत्पादन कसे घ्यावे याबाबत मार्गदर्शन केले. पढेगाव येथील प्रगतशील शेतकरी शंकरराव चौधरी यांनी विद्यापीठाचे अपेक्षित उत्पादन आधारित खतमात्रा व्यवस्थापन याबाबत त्यांनी स्वतःच्या शेतावर घेतलेल्या गहू ऊस पिकावरील यशस्वी उत्पादनाचे अनुभव यावेळी सांगितले. सहाय्यक कृषि अधिकारी आदिनाथ धुमाळ यांनी सूत्रसंचालन केले. गोरक्षनाथ बडदे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी वरिष्ठ संशोधन सहाय्यक शुभांगी कदम, कृषि सहाय्यक शेषराव देशमुख, कृषि विभागाच्या सहाय्यक कृषि अधिकारी श्रीमती जे. एन. वाडेकर, श्रीमती सी.एस. क्षीरसागर तसेच प्रगतशील शेतकरी योगेश शहाणे, किशोर कुर्हे, दादासाहेब कुताळ, शिवाजी कोरे, राधाकिसन राजूळे, विनय भगत, ज्ञानदेव भगत व परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## नवी मुंबई एसीपी विजय चौधरी यांनी कुस्ती स्पर्धेत पटकावले विजेते पद



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२०, नवी मुंबई :** विजय चौधरी, सहाय्यक पोलिस आयुक्त, नवी मुंबई पोलिस यांनी पुन्हा एकदा आपल्या दमदार खेळाची छाप उमटवत कामोठे येथे पार पडलेल्या प्रतिष्ठेच्या परेशशेठ ठाकूर केसरी कुस्ती स्पर्धेत विजेतेपद पटकावले. अंतिम आणि अटीतटीच्या लढतीत त्यांनी हरियाणाच्या बलाढ्य पैलवान संदीप कुमार याला घुटना डावावर चितपट करत उपस्थित हजारो कुस्तीप्रेमींच्या टाळ्यांचा कडकडाट मिळविला. कामोठ्यातील मैदानात सुरू झालेल्या या महासंग्रामाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. सुरुवातीपासूनच हरियाणाच्या संदीप कुमारने आक्रमक खेळ करत विजय चौधरी यांच्यावर दबाव निर्माण केला. काही क्षणांसाठी संदीपने चौधरींवर मजबूत पकड मिळवत मैदान आपल्या बाजूने झुकले होते. मात्र अनुभवी आणि शांत डोक्याने खेळणाऱ्या विजय चौधरी यांनी संयम राखत योग्य संधीची वाट पाहिली.दोन्ही पैलवानांमध्ये तब्बल १५ मिनिटे जोरदार झुंज रंगली. मैदानातील प्रत्येक डावावर प्रेक्षकांचा श्वास रोखला जात होता. अखेर योग्य क्षण साधत विजय चौधरी यांनी आपल्या खास घुटना डावाचा अप्रतिम वापर केला आणि क्षणार्धात संदीप कुमारला चितपट करत मैदान दणाणून सोडले. या विजयाने संपूर्ण मैदानात जल्लोष उसळला.विशेष म्हणजे, सामन्यादरम्यान निवेदकांनी विजय चौधरी यांनी नुकत्याच झालेल्या हिंदकेसरी कुस्ती स्पर्धा मध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा उल्लेख करताच उपस्थित प्रेक्षकांनी उभे राहून टाळ्यांचा आणि घोषणांचा वर्षाव केला. विजय चौधरी विजय चौधरी अशा घोषणांनी संपूर्ण मैदान दुमदुमून गेले. या शानदार विजयाबद्दल विजय चौधरी यांना रोख पारितोषिक तसेच मानाची चांदीची गदा प्रदान करण्यात आली. ही ऐतिहासिक कुस्ती लावण्यासाठी मैदानात रामशेठ ठाकूर, महेशदादा लांडगे, प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर तसेच संयोजक नगरसेवक हॅपी सिंग उपस्थित होते. याच मैदानात झालेल्या इतर लढतींमध्ये किरण भगत आणि सिकंदर शेख यांनीही दमदार विजय मिळवत प्रेक्षकांची वाहवा मिळविली. कामोठ्यातील या भव्य कुस्ती स्पर्धेमुळे पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या मातीतील पारंपरिक कुस्तीची ताकद आणि आकर्षण अनुभवायला मिळाले. विजय चौधरी यांच्या झुंजार खेळाने आणि जिद्दीने कुस्तीप्रेमींच्या मनावर पुन्हा अधिराज्य गाजवले.

## संकल्प संस्था आयोजित प्यारा कौन्सिलिंग कोर्स

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, मुंबई :** मानसिक ताण, नातेसंबंधातील संघर्ष, व्यसनाधीनता, नैराश्य आणि सामाजिक समस्यांच्या वाढत्या पार्श्वभूमीवर संकल्प संस्था आयोजित प्यारा कौन्सिलिंग कोर्स सुरू करण्यात आला आहे. हा अनुभवाधारित कोर्स असून, प्रभावी संवाद कौशल्य, सक्रिय ऐकणे, मानसिक आरोग्य, भावनिक आधार, ताणतणाव व्यवस्थापन, किशोरवयीन व महिला समुपदेशन, नेतृत्व कौशल्य आदी विषयांवर प्रशिक्षण दिले जाणार आहे. कोर्समध्ये ८ रविवार प्रशिक्षण व २ शैक्षणिक भेटींचा समावेश असून, प्रशिक्षण नेहरू नगर, कुर्ला येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत होणार आहे. सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, NGO कार्यकर्ते, युवक-युवती व वैयक्तिक विकास इच्छिणाऱ्यांसाठी हा कोर्स उपयुक्त ठरणार आहे.

प्रवेश मर्यादित असून नोंदणी सुरू आहे.

**संपर्क : विनोद हिवाळे – ९९६९३९१०२५**